प्रकरण – IV

लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय प्रतिवेदन पद्धती

प्रकरण IV

लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय प्रतिवेदन पद्धती

एक मजबूत अंतर्गत वित्तीय अहवाल प्रणाली आणि संबंधित नियम आणि कार्यपद्धतींचे पालन हे सुशासनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देते. आर्थिक नियम, कार्यपद्धती आणि निर्देशांचे पालन तसेच अशा अनुपालनाच्या स्थितीबद्दल अहवाल तयार करण्याची कालबद्धता आणि गुणवत्ता हे अशाप्रकारे सुशासनाचे एक वैशिष्ट्य आहे. अनुपालन आणि नियंत्रणांवरील अहवाल, प्रभावी आणि कार्यान्वित असल्यास, धोरणात्मक नियोजन आणि निर्णय घेण्यासह मूलभूत कारभाराच्या जबाबदारीची पूर्तता करण्यास शासनाला मदत करेल.

या प्रकरणात राज्य शासनाच्या विविध प्राधिकाऱ्यांनी सादर केलेल्या लेख्यांची गुणवत्ता आणि राज्य शासनाच्या विविध विभागीय अधिकाऱ्यांकडून विहित आर्थिक नियम व विनियमांचे पालन न केल्याच्या मुद्द्यांवर भाष्य करण्यात आले आहे.

लेख्यांच्या परिपूर्णतेशी संबंधित मुद्दे

4.1 व्याज देणाऱ्या ठेवी/राखीव निधीवरील व्याजाच्या संदर्भात दायित्व न फेडणे

'व्याज देणाऱ्या (व्याजी) ठेवी' आणि 'व्याज देणारे (व्याजी) राखीव निधी' मधील रकमेवर व्याजाची तरतूद करणे आणि व्याज देणे हे शासनाचे दायित्व आहे. 1 एप्रिल 2023 रोजी, 'व्याज देणाऱ्या ठेवी' मध्ये ₹ 61,029.16 कोटी आणि 'व्याज देणारे राखीव निधी' यामध्ये ₹ 5,511.20 कोटी, शिल्लक होते, ज्यावर शासनाने अनुक्रमे ₹ 2,913.60 कोटी आणि ₹ 500.74 कोटी व्याजाची तरतूद केली. तथापि, 'व्याज देणाऱ्या ठेवी' आणि 'व्याज देणारे राखीव निधी' यांच्या व्याजाच्या संदर्भात, **तक्ता 4.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे ₹ 552.39 कोटी प्रदान केले नव्हते/कमी प्रदान केले होते.

तक्ता 4.1: व्याज देणाऱ्या ठेवी/राखीव निधीच्या व्याजासंदर्भात दायित्व चुकते न करणे

(₹ कोटीत)

अ. क्र.	निधी/ठेव	01/04/2023 रोजी आरंभीची शिल्लक	प्रदान केलेल्या व्याजाच्या परिगणनेचा आधार	देय व्याज	प्रदान केलेले व्याज	प्रदान न केलेले व्याज
1	शासकीय कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना	7,464.60	सामान्य भविष्य निर्वाह निधी वरील देय व्याज दरानुसार केलेली व्याजाची गणना (म्हणजेच 7.10 *टक्के*)	441.30	212.37	228.93
2	राज्य प्रतिपूरक वनीकरण निधी	2,781.77	वर्ष 2023-24 साठी पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार 3.35 *टक्के*	93.89	0.00	93.89

अ. क्र.	निधी/ठेव	01/04/2023 रोजी आरंभीची शिल्लक	प्रदान केलेल्या व्याजाच्या परिगणनेचा आधार	देय व्याज	प्रदान केलेले व्याज	प्रदान न केलेले व्याज
3	राज्य आपत्ती शमन निधी	2,074.00	राज्य आपत्ती शमन निधीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अधिकर्षासाठी लागू दर सरासरी रेपो दर + दोन *टक्के* (म्हणजेच 8.50 *टक्के*) यानुसार व्याजाची परिगणना केली.	216.38	0.00	216.38
4	व्याज देणाऱ्या इतर ठेवी	561.22	वर्ष 2023-24 साठी व्याजाची परिगणना 14 दिवसांच्या कोषागार देयक गुंतवणुकीसाठी लागू होणाऱ्या दराने म्हणजेच रिव्हर्स रेपो दर @3.35 *टक्के* वजा एक *टक्का* म्हणजे 2.35 *टक्के* दराने व्याजाची परिगणना केली.	13.19	0.00	13.19
	एकूण	**12,881.59**		**764.76**	**212.37**	**552.39**
स्त्रोत: वित्तीय लेखे 2023-24						

व्याजाचे प्रदान न केल्याच्या परिणामी महसुली तूट आणि राजकोषीय तूट यामध्ये त्या प्रमाणात उनोक्ती झाली.

4.2 राज्य अंमलबजावणी अभिकरणांना निधी थेट हस्तांतरित

विविध योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासन राज्य अंमलबजावणी अभिकरणांना लक्षणीय प्रमाणात निधी थेट हस्तांतरित करते. हा निधी राज्याच्या अर्थसंकल्प/राज्य कोषागार प्रणालीद्वारे अग्रेषित केला जात नसल्याने राज्याच्या वित्तीय लेख्यामध्ये प्रतिबिंबित होत नाही आणि त्यामधून त्याप्रमाणात राज्याच्या जमा व खर्च तसेच इतर वित्तीय घटक/मापदंड यांचे अनुमान काढता येत नाही. याकरिता 1 एप्रिल 2014 पासून केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रीय सहाय्य यांच्याशी संबंधित सर्व सहाय्य अंमलबजावणी अभिकरणांना न देता राज्य शासनाकडे थेट हस्तांतरित करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला.

परंतु, केंद्र शासनाने केंद्रीय निधी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठविण्याऐवजी राज्य अंमलबजावणी यंत्रणांकडे थेट हस्तांतरित करणे सुरूच ठेवले. 2023-24 मध्ये, ₹ 24,212.81 कोटींचा केंद्रीय निधी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठविण्याऐवजी राज्य अंमलबजावणी यंत्रणांकडे थेट वर्ग करण्यात आला. हे संबंधित योजनांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार होते.

हा हस्तांतरित केलेला निधी वित्तीय लेख्यांच्या भाग II च्या परिशिष्ट VI मध्ये दर्शविला आहे. 2019-20 ते 2021-22 दरम्यान राज्य अंमलबजावणी अभिकरणांकडे थेट हस्तांतरण करण्याचा वाढता कल दिसून आला. परंतु 2022-23 मध्ये त्यात किंचित घट झाली आणि 2023-24 मध्ये त्यात वाढ झाली जे **तक्ता 4.2** मध्ये तपशीलवार आहे.

तक्ता 4.2: 2019-20 ते 2023-24 दरम्यान अंमलबजावणी अभिकरणांना थेट हस्तांतरित केलेला निधी

(₹ कोटीत)

वर्ष	2019-20	2020-21	2021-22	2022-23	2023-24
राज्य अंमलबजावणी अभिकरणांना थेट हस्तांतरण	7851.42	12599.90	14793.46	13075.13	24212.81
स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे					

वर्ष 2023-24 मध्ये, 30 केंद्रीय योजनेंतर्गत ₹ 24,212.81 कोटींचा केंद्रीय हिस्सा राज्याचा एकत्रित निधी डावलून थेट अंमलबजावणी अभिकरणांना हस्तांतरित करण्यात आला जे **परिशिष्ट 4.1** मध्ये तपशीलवार दर्शविले आहे.

पारदर्शकतेशी संबंधित मुद्दे

4.3 उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यास विलंब

मुंबई वित्तीय नियम, 1959 चा नियम 4 (परिशिष्ट 22 कलम I) प्रतिपादित करतो की, ज्या प्रकरणांमध्ये खर्चाच्या उद्देशांच्या वैशिष्ट्यांच्या स्वरूपात अनुदानाच्या वापराशी अटी जोडल्या गेल्या असतील किंवा निधी किती कालावधीत खर्च केला पाहिजे किंवा अन्यथा, जोपर्यंत त्याविरुद्ध कोणताही विशेष नियम किंवा आदेश नसेल तेथे प्रामुख्याने अनुदान मंजूर करणारे अधिकारी, प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र यांना प्रमाणपत्र सादर करण्यासाठी जबाबदार असतील. तसेच, सदर तरतुदीचा नियम 5 (i) स्पष्टपणे असे नमूद करतो की मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याने कोणतीही कालमर्यादा निश्चित केली नसल्यास अनुदान वाजवी वेळेत उद्दिष्टांवर खर्च केले जाईल. वाजवी वेळेचा अर्थ स्पष्टपणे नमूद केला नसेल तर सामान्यत: अनुदान मंजूर करण्याच्या पत्राच्या तारखेपासून एक वर्ष असा केला जावा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या 12 जानेवारी 2023 च्या शासन निर्णयाद्वारे सहाय्यक अनुदानाचे ‘सशर्त’ आणि ‘बिनशर्त’ असे वर्गीकरण केले आहे. केवळ ‘सशर्त’ म्हणून वर्गीकृत केलेल्या सहाय्यक अनुदान आदेशांची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

31 मार्च 2024 पर्यंत, राज्य शासनाच्या 32 विभागांना वितरित करण्यात आलेल्या सशर्त अनुदानांच्या संदर्भात ₹ 36,756.09 कोटींची नियत 10,793 उपयोगिता प्रमाणपत्रे (केंद्र पुरस्कृत योजनांची ₹ 2,615.22 कोटींची प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे समाविष्ट) सादर करण्यात आली नव्हती, जी राज्याच्या एकूण एकत्रित खर्चाच्या (₹ 5,62,714.85 कोटी) 6.53 *टक्के* होती. उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यास झालेल्या विलंबाचा वर्ष-निहाय तपशील **तक्ता 4.3** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 4.3: सादरीकरणासाठी नियत उपयोगिता प्रमाणपत्रांचा वर्ष-निहाय तपशील

(₹ कोटीत)

वर्ष*	उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या	रक्कम	टक्केवारी
2014[1] पर्यंत	563	6262.19	17.04
2014-15	26	266.63	0.73
2015-16	14	248.24	0.68
2016-17	93	258.27	0.70

[1] यामध्ये 2001-02 कालावधीशी संबंधित 0.13 कोटींच्या, सादरीकरणासाठी प्रलंबित असलेल्या एका उपयोगिता प्रमाणपत्राचा समावेश आहे

वर्ष*	उपयोगिता प्रमाणपत्रांची संख्या	रक्कम	टक्केवारी
2017-18	195	268.78	0.73
2018-19	442	786.11	2.14
2019-20	587	1678.33	4.57
2020-21	622	1502.31	4.09
2021-22	562	2481.27	6.75
2022-23	1895	4170.63	11.35
2023-24	5794	18833.33	51.24
एकूण	**10793**	**36756.09**	**100**

*नमूद केलेले वर्ष 'नियत वर्ष' याच्याशी संबंधित आहे, म्हणजेच रकमा आहरीत केल्यानंतर 12 महिने
स्त्रोत: प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयाने संकलित केलेली माहिती

वरील प्रकरणांतील उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न झाल्याने देण्यात आलेल्या अनुदानाच्या पूर्ण उपयोगितेची पडताळणी होऊ शकली नाही. उपयोगिता प्रमाणपत्रे प्रलंबित असूनही संस्थांना अनुदाने मंजूर केली गेली हे अनुदान मंजूर करण्यातील नियंत्रणाचा अभाव दर्शविते. म्हणून, शासनाने पुढील अनुदाने वितरित करण्यापूर्वी वर्षभराहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या अशा सर्व उपयोगिता प्रमाणपत्रांचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे.

उपयोगिता प्रमाणपत्रांची प्रलंबितता 2022-23 मधील ₹ 25,759.38 कोटींच्या 9,280 उपयोगिता प्रमाणपत्रांवरून 2023-24 मध्ये ₹ 36,756.09 कोटींची 10,793 उपयोगिता प्रमाणपत्रे इतकी वाढली. प्रत्येक वर्षातील विभाग-निहाय प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रांचा तपशील **परिशिष्ट 4.2** मध्ये दर्शविला आहे.

आलेख 4.1: प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे

(₹ कोटीत)



(स्रोत: वित्तीय लेखे 2023-24)

आलेख 4.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, उपयोगिता प्रमाणपत्रे सादर न केल्याची बहुसंख्य प्रकरणे नगर विकास विभाग (30.64 *टक्के*), नियोजन विभाग (13.17 *टक्के*) जलसंपदा विभाग (9.65 *टक्के*) आणि ग्रामीण विकास विभाग (9.60 *टक्के*) यांच्याशी संबंधित आहेत. विहित कालावधीच्या उपरांत प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे अनुदानाचा विनियोग अभिप्रेत हेतुसाठी झाला होता याची शाश्वती

देण्यातील अभाव दर्शवितात आणि लेख्यांमध्ये दाखविलेला खर्च त्या प्रमाणात अंतिम करता येत नाही.

4.3.1 अनुदानप्राप्त संस्थांची "इतर" म्हणून नोंद

सहाय्यक अनुदान म्हणजे एका शासकीय संस्था/संस्था/व्यक्तीने दुसऱ्या शासकीय संस्था/संस्था/ व्यक्तीला केलेली मदत, देणग्या किंवा अंशदान या स्वरुपातील प्रदाने.

वित्तीय लेख्यानुसार, गेल्या पाच वर्षात (2019-20 ते 2023-24) राज्याच्या एकूण खर्चापैकी 35.52 *टक्के* ते 39.04 *टक्के* खर्च हा सहाय्यक अनुदान आहे. तसेच असे निदर्शनास आले की **तक्ता 4.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे गेल्या पाच वर्षांत 48.59 *टक्क्यांहून* अधिक सहाय्यक अनुदान विविध संस्थांना वितरित करण्यात आले ज्यांना 'इतर' असे वर्गीकृत करण्यात आले.

तक्ता 4.4 : 2019-20 ते 2023-24 या दरम्यान 'इतर' यांना वितरित करण्यात आलेल्या सहाय्यक अनुदानाचा तपशील

(₹ कोटीत)

वर्ष	एकूण खर्च	एकूण मुक्त करण्यात आलेले सहाय्यक अनुदान	एकूण खर्चाच्या *टक्केवारीत* सहाय्यक अनुदान	'इतर' यांना मुक्त केलेले सहाय्यक अनुदान	मुक्त करण्यात आलेल्या एकूण सहाय्यक अनुदानाच्या *टक्केवारीत* 'इतर' यांना मुक्त करण्यात आलेले सहाय्यक अनुदान
2019-20	338690.64	132235.02	39.04	77776.05	58.82
2020-21	342638.31	131439.43	38.36	68577.83	52.17
2021-22	398792.31	152336.85	38.20	84464.31	55.45
2022-23	473922.42	183125.48	38.64	97268.28	53.12
2023-24	562714.85	199894.70	35.52	97126.63	48.59
स्त्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे.					

वित्तीय लेखे 2023-24 नुसार, सहाय्यक अनुदान (₹ 1,99,894.70 कोटी) हे राज्याच्या एकूण खर्चाच्या 35.52 *टक्के* (₹ 5,62,714.85 कोटी) इतके होते. एकूण ₹ 1,99,894.70 कोटींच्या सहाय्यक अनुदानापैकी ₹ 97,126.63 कोटी (48.59 *टक्के*) रक्कम ही 'इतर' म्हणून वर्गीकृत केलेल्या अनुदानित संस्थांना वितरित करण्यात आली. अनुदानित संस्थांच्या तपशीलाअभावी लेख्यांच्या पारदर्शकतेवर आणि या सहाय्यक अनुदानाच्या बदल्यात उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या संनियंत्रणावर विपरीत परिणाम होतो.

राज्य शासनाने उपयोगिता प्रमाणपत्राच्या सादरीकरणावर संनियंत्रण ठेवण्यासाठी आणि प्रत्येक संस्थेवरील थकित रकमेच्या पडताळणीसाठी अशा संस्थांना सांकेतांक नेमून देणारी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

4.4 संक्षिप्त आकस्मिक देयके

महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या नियम 282 (2) नुसार, तात्काळ वाटपाची गरज असल्याशिवाय कोषागारातून निधी काढता येत नाही. महाराष्ट्र कोषागार नियम 1968, याचबरोबर महाराष्ट्र शासन, वित्त विभाग विनियमन (फेब्रुवारी 2008) नुसार, आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी अंतिम खर्चाच्या समर्थनार्थ प्रमाणक असलेली प्रतिस्वाक्षरीत तपशीलवार आकस्मिक देयके ही संक्षिप्त आकस्मिक देयके काढल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे आणि

कोणत्याही परिस्थितीत, वित्त विभागाच्या संमतीने प्रशासकीय विभागाने परवानगी दिली नसल्यास, अशी अग्रिम रक्कम काढल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

मार्चमध्ये संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या माध्यमातून काढलेल्या लक्षणीय रकमा हे दर्शविते की काढलेल्या रकमा या प्रामुख्याने अर्थसंकल्पातील तरतुदी संपवण्यासाठी होत्या आणि अपुरे अर्थसंकल्पीय नियंत्रण दर्शविते. विभाग-निहाय तपशीलवार आकस्मिक देयकांची प्रलंबितता **परिशिष्ट 4.3** मध्ये दर्शविण्यात आली आहे. 1,438 संक्षिप्त आकस्मिक देयकांद्वारे काढलेली एकूण ₹ 3,674.60 कोटींची तपशीलवार आकस्मिक देयके मार्च 2024 अखेरीस प्रलंबित होती जी **तक्ता 4.5** मध्ये तपशीलवार दर्शविली आहेत.

तक्ता 4.5: प्रलंबित संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या बदल्यात तपशीलवार आकस्मिक देयकांच्या सादरीकरणाची वर्ष-निहाय प्रगती

(₹ कोटीत)

वर्ष	काढलेली संक्षिप्त आकस्मिक देयके		प्राप्त झालेली तपशीलवार आकस्मिक देयके		31 मार्च 2024 पर्यंत प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके	
	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम
2022-23 पर्यंत	1837	4185.96	824	1301.95	1013	2884.01
2023-24	1198	831.10	773	40.51	425	790.59
एकूण	**3035**	**5017.06**	**1597**	**1342.46**	**1438**	**3674.60**

स्रोत: वित्तीय लेखे 2023-24

2023-24 मधील काढलेल्या ₹ 831.10 कोटीच्या 1,198 संक्षिप्त आकस्मिक देयकांपैकी ₹ 734.42 कोटी (88.37 *टक्के*) रकमेची 244 संक्षिप्त आकस्मिक देयके मार्च 2024 मध्ये काढण्यात आली. पाच प्रमुख विभागांच्या संदर्भात प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयकांची स्थिती **आलेख 4.2** मध्ये दर्शविण्यात आली आहे**.**

आलेख 4.2: मुख्य विभागांची प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयके

(₹ कोटीत)



(स्त्रोत: वित्तीय लेखे 2023-24)

आलेख 4.2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रलंबित तपशीलवार आकस्मिक देयकांची 65.34 *टक्के* रक्कम वैद्यकीय शिक्षण व औषध विभागाशी (₹ 2,400.86 कोटी) आणि 20.58 *टक्के* सार्वजनिक आरोग्य विभागाशी (₹ 756.17 कोटी) संबंधित आहे.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादितच्या माध्यमातून औषधे, वैद्यकीय उपकरणे इत्यादींच्या खरेदीसाठी तीन विभागांनी (उदा. सार्वजनिक आरोग्य विभाग, नियोजन विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषध विभाग) संक्षिप्त आकस्मिक देयकांचा वापर करून रक्कम काढली. अशा खरेदीसंदर्भात, समायोजनासाठी प्रलंबित असलेल्या एकूण संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या 69.45 *टक्के* म्हणजे ₹ 2,552.14 कोटीची 648 संक्षिप्त आकस्मिक देयके वर्ष अखेरीस समायोजित झाली नाहीत.

संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या माध्यमातून काढलेली रक्कम राज्याच्या एकत्रित निधीतील कार्यशील प्रमुख शीर्षांतर्गत लेखांकित केली जाते. जोपर्यंत तपशीलवार आकस्मिक देयकांच्या माध्यमातून काढलेल्या रकमेचा दिलेल्या वेळेत हिशेब निकाली निघत नाही, तोपर्यंत हा खर्च योग्य किंवा अंतिम मानला जाऊ शकत नाही. तपशीलवार आकस्मिक देयके सादर न करणे हे विभागाच्या तसेच कोषागारांच्या संनियंत्रणाचा अभाव दर्शविते.

4.5 वैयक्तिक ठेव खाती

वैयक्तिक ठेव खाती, ही कोषागारात ठेवलेल्या बँकिंग खात्याच्या स्वरूपात असतात. महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 चे नियम 494 व मुंबई वित्तीय नियम, 1959 च्या नियम 12 अन्वये राज्याच्या महालेखाकारांच्या सल्ल्याने शासनाच्या मान्यतेच्या आधारे कोषागार अधिकाऱ्यांकडे विशिष्ट कारणांसाठी वैयक्तिक ठेव खाती उघडता येतात.

तसेच, महाराष्ट्र कोषागार नियमाच्या नियम 495 नुसार एकत्रित निधीमधून निधी हस्तांतरित करून वैयक्तिक ठेव खात्यात विशिष्ट कारणांसाठी आवश्यक निधी ठेवण्याकरिता महाराष्ट्र शासनाला प्राधिकृत केले आहे. ज्या प्रकरणांमध्ये वैयक्तिक ठेव खाती एकत्रित निधीत खर्ची (डेबिट) पडतात, अशा प्रकरणांमध्ये संबंधित सेवा शीर्षामध्ये एकत्रित निधीतील शिल्लक रक्कम उणे खर्ची (मायनस डेबिट) करून आर्थिक वर्षाच्या अखेरीस ती बंद करावी. 31 मार्च 2024 अखेरीस 1,248 वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये ₹ 16,381.87 कोटी शिल्लक होते, जे राज्याच्या एकूण एकत्रित खर्चाच्या 2.91 (₹ 5,62,714.85 कोटी) *टक्के* होते.

महाराष्ट्र कोषागार नियम, 1968 च्या नियम 495 व महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या 585(2) नुसार एक वर्षापेक्षा जास्त काळ निष्क्रिय असलेली वैयक्तिक ठेव खाती बंद करून अश्या खात्यांमधील शिल्लक रक्कम मुख्य शीर्ष 0075 अंतर्गत संकीर्ण महसूल म्हणून शासनाच्या खात्यात जमा करणे आवश्यक आहे. 2023-24 मध्ये ₹ 19.53 कोटींची 171 वैयक्तिक ठेव खाती बंद करून हा निधी राज्याच्या एकत्रित निधीत समायोजित करण्यात आला. 128 वैयक्तिक ठेव खाती प्रशासकांनी एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी कार्यरत न ठेवल्यामुळे मार्च 2024 पर्यंत वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये ₹ 88.21 कोटी निष्क्रिय पडून असल्याचे निदर्शनास आले. वैयक्तिक ठेव खात्यात पडून असलेल्या शिल्लक रकमेचे राज्याच्या एकत्रित निधीत हस्तांतरण न केल्यामुळे लोक निधीचा गैरवापर होण्याचा धोका संभावितो.

2019-20 ते 2023-24 या कालावधीतील वैयक्तिक ठेव खात्यांची स्थिती **तक्ता 4.6** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 4.6: 2023-24 मध्ये वैयक्तिक ठेव खात्यांची स्थिती

(₹ कोटीत)

वर्ष	आरंभीची शिल्लक		वर्षभरात वाढ		वर्षभरात बंद		अखेरीची शिल्लक	
	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम	संख्या	रक्कम
2019-20	2135	10953.53	6	24135.37	57	24770.93	2084	10317.97
2020-21	2084	10317.90	0[2]	16288.51	109	15800.66	1975	10805.82
2021-22	1975	10805.82	2	21065.32	325	21348.47	1652	10522.67
2022-23	1652	10522.67	6	26994.71	176	26263.00	1482	11254.38
2023-24	1329*	11254.38	90	30700.56	171	25573.07	1248	16381.87

*प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I यांनी मागील वर्षातील चुका दुरुस्त केल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत तफावत.

स्त्रोत : संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे

वर्ष 2023-24 मध्ये वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये वाढ ही चार[3] विभागांमध्ये सहाय्यक अनुदान वाटपासाठी आभासी वैयक्तिक ठेव खाती उघडल्यामुळे झाली आहे. वैयक्तिक ठेव खात्यांमध्ये निधी ठेवल्यामुळे सेवा शीर्षांतर्गत लेखांकीत केलेला खर्च प्रत्यक्ष खर्च न करता जास्त दाखविला गेलाच, शिवाय प्रत्यक्ष खर्चावरील कोषागाराचे नियंत्रणही कमी झाले. 2023-24 मध्ये राज्याच्या एकत्रित निधीतून वैयक्तिक ठेव खात्यात ₹ 4,863.11 कोटी हस्तांतरित करण्यात आले. यामध्ये मार्च 2024 मध्ये हस्तांतरित करण्यात आलेल्या ₹ 3,976.69 कोटीचा समावेश आहे, ज्यापैकी ₹ 585.28 कोटी मार्च 2024 च्या कामकाजाच्या शेवटच्या दिवशी हस्तांतरित करण्यात आले.

कोषागाराने संबंधित प्रशासकांशी वैयक्तिक ठेव खात्यांचा मेळ घालणे आवश्यक असताना, वैयक्तिक ठेव खात्यांच्या केवळ 268 प्रशासकांनी (1,248 पैकी) त्यांच्या शिल्लक रकमेचा ताळमेळ घेतला होता आणि शिलकीची पडताळणी केली होती.

शिल्लक रकमेचे विश्लेषण व योग्य ताळमेळ घेणे, हिशेब बंद करणे आणि अखर्चित शिल्लक रक्कम राज्याच्या एकत्रित निधीला परत करणे यासाठी प्रशासकांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4.6 गौण शीर्ष-800 याचा अविवेकी वापर

'इतर जमा/इतर खर्च' संबंधित सर्वसमावेशक (ओम्नीबस) गौण शीर्ष 800 केवळ अशा प्रकरणांमध्येच वापरावयाचे असते जेव्हा लेख्यांमध्ये योग्य गौण शीर्षाची तरतूद मुख्य शीर्षांतर्गत केलेली नसते. अशा घटना नियमितपणे घडत असतील तर प्रधान महालेखापाल (लेखे व अनुज्ञेयता) यांच्याशी चर्चा करून योग्य वर्गीकरणाबाबत सल्ला घेण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. गौण शीर्ष '800- इतर जमा व खर्च' अंतर्गत जमा व खर्चाच्या अविवेकी नोंदी केल्याने व्यवहारांच्या पारदर्शकतेवर व स्वरूपावर परिणाम होतो व लेखे अपारदर्शक होतात.

2023-24 मध्ये राज्य शासनाने ₹ 16,730.54 कोटींच्या खर्चाचे वर्गीकरण 50 महसुली आणि भांडवली मुख्य शीर्षांतर्गत 800-इतर खर्च या गौण शीर्षाखाली केले जे एकूण एकत्रित खर्चाच्या (₹ 5,62,714.85 कोटी) 2.97 *टक्के* होते.

---

[2] वर्ष 2020-21 मध्ये कोणतेही वैयक्तिक ठेव खाते उघडण्यात आले नाही, ₹ 16,288.51 विद्यमान खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यात आले

[3] (1) जिल्हा प्रशासन (2) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (3) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (4) आदिवासी विकास

2019-20 ते 2023-24 दरम्यान एकूण एकत्रित खर्चाच्या *टक्केवारीत* गौण शीर्ष 800 - इतर खर्च याच्या कार्यान्वयाची व्याप्ती **आलेख 4.3** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 4.3: 2019-20 ते 2023-24 दरम्यान गौण शीर्ष 800- इतर खर्च यांचे कार्यान्वयन



(स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे)

आलेख 4.3 वरून असे दिसून येते की, एकूण खर्चाचा भाग म्हणून गौण शीर्ष 800 - इतर खर्च याचा वाटा कमी झाला असून, त्याचा वाटा 2019-20 मधील 6.61 *टक्क्यां*वरून 2023-24 मध्ये 2.97 *टक्के* इतका कमी झाला आहे.

दिलेल्या मुख्य शीर्षातील खर्चाचा बराचसा भाग गौण शीर्ष 800 - 'इतर खर्च' अंतर्गत वर्गीकृत केल्याची उदाहरणे **तक्ता 4.7** मध्ये दिली आहेत.

तक्ता 4.7: 2023-24 मध्ये गौण शीर्ष 800 - इतर खर्च अंतर्गत नोंदविलेला लक्षणीय खर्च

(₹ कोटीत)

अ.क्र	मुख्य शीर्ष	तपशील	रकाना (2) मध्ये नमूद केलेल्या प्रमुख शीर्षाखालील गौण शीर्ष 800 अंतर्गत खर्च	रकाना (2) मधील प्रमुख शीर्षाखालील एकूण खर्च	रकाना (4) ची रकाना (5) शी *टक्केवारी*
1	2	3	4	5	6
1	4070	इतर प्रशासकीय सेवांवरील भांडवली खर्च	2628.78	2737.43	96
2	4055	पोलिसांवरील भांडवली खर्च	177.83	797.75	22
3	2701	मोठे व मध्यम पाटबंधारे	621.37	1624.64	38
4	2216	गृहनिर्माण	2182.93	5156.11	42
5	2515	इतर ग्रामविकास कार्यक्रम	2529.13	9093.23	28
6	2210	वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य	2799.54	18725.74	15
स्त्रोत : वित्तीय लेखे 2023-24					

लेखापरीक्षणात ₹ 50 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून गौण शीर्ष 800 अंतर्गत लेखांकित करण्यात आलेल्या 42 प्रकरणांची पडताळणी केली असता असे लक्षात आले की,

खाली उल्लेख केलेल्या प्रकरणांचे लेखांकन करण्यासाठी मुख्य व गौण शीर्षांच्या यादीत 800 सोडून इतर वैध गौण शीर्ष उपलब्ध होते.

(i) मुख्य व गौण शिर्षांच्या यादीनुसार, 'जिल्हा परिषदा/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य' हे संबंधित खर्च शीर्षकाच्या (महसूल लेखे) गौण शीर्ष 196 अंतर्गत अंदाजित व लेखांकित करणे आवश्यक आहे. मात्र, खालील प्रकरणांमध्ये गौण शीर्ष 800- इतर खर्च अंतर्गत लेखांकित करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

मुख्य शीर्ष	गौण शीर्ष	तपशील	₹ कोटीत
2515	800	ग्रामीण विकास कार्यक्रमांसाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदान	2517.75
3054	800	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	68.90
3054	800	ग्रामीण रस्त्यांच्या विकास व मजबुतीकरणासाठी जिल्हा परिषदेला अनुदान	50.73

(ii) खाली दिलेल्या तपशीलानुसार 'प्रमुख कामे' गौण शीर्ष- '051-बांधकाम' ऐवजी गौण शीर्ष 800-इतर खर्च अंतर्गत लेखांकीत करण्यात आला.

मुख्य शीर्ष	गौण शीर्ष	तपशील	₹ कोटीत
4070	800	महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण बांधकाम	1302.53
4070	800	पोलीस विभागासाठी महाराष्ट्र राज्य पोलिस गृहनिर्माण कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम	646.55
4070	800	महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत विक्रीकर इमारतीचे बांधकाम	600.00
4070	800	पोलिसांसाठी भूसंपादन व इमारत बांधकामावर खर्च	60.00

(iii) मुख्य शीर्ष 4055-पोलिसांवरील भांडवली खर्च अंतर्गत सीसीटीव्ही पाळत यंत्रणा बसविण्यासाठी ₹ 133.87 कोटी गौण शीर्ष- 207 राज्य पोलिसांऐवजी गौण शीर्ष 800 अंतर्गत लेखांकित करण्यात आले.

(iv) मुख्य शीर्ष 2202 अंतर्गत ₹ 143.05 कोटींची राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती रक्कम गौण शीर्ष 107- शिष्यवृत्ती ऐवजी गौण शीर्ष 800 अंतर्गत लेखांकित करण्यात आली.

(v) मुख्य शीर्ष 2225 अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता खर्च अंतर्गत गौण शीर्ष 277 - शिक्षण किंवा गौण शीर्ष - 793 अनुसूचित जाती घटक योजनेकरीता विशेष केंद्रीय सहाय्यऐवजी गौण शीर्ष 800 अंतर्गत अंदाजित करून लेखांकित करण्यात आला.

त्याचप्रमाणे, 2023-24 मध्ये राज्य शासनाने 53 मुख्य शीर्षांशी संबंधित ₹ 5,307.62 कोटींच्या जमेचे गौण शीर्षांतर्गत "800-इतर जमा" अंतर्गत वर्गीकरण केले जे एकूण एकत्रित महसुली जमेच्या (₹ 5,57,326.18 कोटी) 0.95 *टक्के* आहे. 2019-20 ते 2023-24 या कालावधीत एकूण एकत्रित

जमेशी *टक्केवारी*नुसार गौण शीर्ष 800 - इतर जमा याच्या कार्यान्वयनाची व्याप्ती **आलेख 4.4** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 4.4: 2019-20 ते 2023-24 दरम्यान गौण शीर्ष 800 - इतर जमा याचे कार्यान्वयन



स्त्रोत: संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

आलेख 4.4 असे दर्शवितो की एकूण जमेचा भाग म्हणून गौण शीर्ष 800 - इतर जमा याचा वाटा कमी होऊन तो 2019-20 मधील 8.52 टक्क्यांवरून 2023-24 मध्ये 0.95 टक्के इतका कमी झालेला आहे. 2023-24 मध्ये दिलेल्या मुख्य शीर्षातील जमांचा बराचसा भाग गौण शीर्ष 800 - 'इतर जमा' अंतर्गत वर्गीकृत केल्याची उदाहरणे **तक्ता 4.8** मध्ये दर्शविली आहेत.

तक्ता 4.8: 2023-24 मध्ये गौण शीर्ष 800 - इतर जमा अंतर्गत लेखांकित केलेल्या लक्षणीय जमा

(₹ कोटीत)

अ.क्र.	मुख्य शीर्ष	तपशील	रकाना (2) मध्ये उल्लेखिलेल्या मुख्य शीर्षाच्या अंतर्गत गौण शीर्ष 800 अंतर्गत जमा	(2) मधील मुख्य शीर्षाच्या अंतर्गत एकूण जमा	[(4) / (5)] ची टक्केवारी
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)
1.	0216	गृहनिर्माण	166.25	166.39	99.92
2.	0217	नगर विकास	1675.43	1756.79	95.37
3.	0235	सामाजिक सुरक्षा आणि कल्याण	697.47	746.84	93.39
4.	0425	सहकार	106.88	119.85	89.18
5.	0070	इतर प्रशासकीय सेवा	2116.95	2392.92	88.47
6.	0250	इतर सामाजिक सेवा	319.17	411.25	77.61
7.	0071	निवृत्तीवेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभांसाठी अंशदान आणि वसुली	114.30	158.22	72.24
8.	0029	जमीन महसूल	1902.49	2689.76	70.73
9.	0202	शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती	315.85	548.18	57.62
10.	0435	इतर कृषी कार्यक्रम	3.68	8.69	42.35

स्त्रोत: वित्तीय लेखे 2023-24

सर्वसमावेशक गौण शीर्ष 800 अंतर्गत मोठ्या रकमेचे वर्गीकरण वित्तीय अहवालातील पारदर्शकतेवर परिणाम करते आणि वाटपाचा प्राधान्यक्रम आणि खर्चाच्या गुणवत्तेच्या योग्य विश्लेषणात विसंगती निर्माण होते.

इतर जमा/इतर खर्चाशी संबंधित सर्वसमावेशक गौण शीर्ष 800 केवळ अशा प्रकरणांमध्ये वापरावे जेथे लेख्यांमध्ये मुख्य शीर्षांतर्गत योग्य त्या गौण शीर्षाची तरतूद केलेली नाही. त्याच मुख्य शीर्ष/इतर मुख्य शीर्ष अंतर्गत योग्य गौण शीर्ष उपलब्ध असतानाही गौण शीर्ष 800 अंतर्गत लेखांकित केल्यास त्याचा लेख्यांच्या पारदर्शकतेवर विपरीत परिणाम होतो..

मोजमापाशी संबंधित मुद्दे

4.7 निलंबन व कर्ज, ठेवी आणि वित्तप्रेषण यांतील मुख्य शीर्षांतर्गत थकित शिल्लक

कोषागारे/अधिदान व लेखा कार्यालये यांनी समायोजनाचे विवरणपत्र सादर न करणे, रिझर्व्ह बँकेकडून समशोधन ज्ञापन प्राप्त न होणे, प्रमाणके प्राप्त न होणे इत्यादी माहितीच्या अभावामुळे लेख्यांमध्ये अंतिम शीर्षांतर्गत नोंद केली जाऊ शकत नाही अशी जमा आणि प्रदानांचे व्यवहार प्रतिबिंबित करण्यासाठी शासकीय लेख्यांमध्ये "निलंबन शीर्ष" म्हणून ओळखले जाणारे काही मध्यस्थ/समायोजन लेखा शीर्ष उघडले जातात. हे व्यवहार अंतिमतः त्यांच्या संबंधित लेखा शीर्षामध्ये नोंदविले गेल्यानंतर हे लेखाशीर्ष व्यवहार उणे खर्च किंवा उणे जमा याद्वारे बंद केले जातात. जर या रकमा समायोजित केल्या नाही तर निलंबन शीर्षा अंतर्गत शिल्लक रकमांचा संचय होईल आणि शासकीय जमा आणि खर्च अचूकपणे प्रतिबिंबित होणार नाहीत.

वित्तप्रेषणांमध्ये लेख्याच्या शीर्षांचे समायोजन करणारे सर्व व्यवहार समाविष्ट आहेत आणि या शीर्षाखालील खर्च (डेबिट) किंवा जमा (क्रेडिट्स) अखेरीस संबंधित जमा (क्रेडिट) किंवा खर्चाद्वारे (डेबिटद्वारे) त्याच किंवा लेखांकनाच्या दुसऱ्या आवर्तनात मंजूर केले जातात.

वित्तीय लेख्यांमध्ये निलंबन व वित्तप्रेषण या शीर्षांमधील निव्वळ शिल्लक दर्शविली जाते. या शीर्षांतर्गत थकित शिल्लक रक्कम विविध शीर्षांखालील थकित खर्च (डेबिट) आणि जमा (क्रेडिट्स) शिल्लक रक्कम स्वतंत्रपणे एकत्रित करून तयार केली जाते. निलंबित व वित्तप्रेषित घटकांचे समशोधन राज्य कोषागार/ बांधकाम आणि वन विभाग इत्यादींनी सादर केलेल्या तपशीलांवर अवलंबून असते.

गेल्या तीन वर्षातील मुख्य निलंबन व वित्तप्रेषण या शीर्षांतर्गत एकूण आकडेवारीची स्थिती **तक्ता 4.9** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 4.9: निलंबन व वित्तप्रेषण शीर्षांतर्गत शिल्लक

(₹ कोटीत)

गौण शीर्ष	2021-22		2022-23		2023-24	
मुख्य शीर्ष 8658-निलंबन	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)
101 - अधिदान व लेखा कार्यालय निलंबन	142.67	29.06	153.27	10.49	131.36	03.06
निव्वळ	खर्ची 113.61		खर्ची 142.78		खर्ची 128.30	
102 - निलंबन लेखे- नागरी	4.26	5.14	34.50	33.08	12.18	13.44

गौण शीर्ष	2021-22		2022-23		2023-24	
मुख्य शीर्ष 8658-निलंबन	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)	खर्ची (डेबिट)	जमा (क्रेडीट)
निव्वळ	जमा (-)0.88		खर्ची 1.42		जमा 1.26	
107 - रोख रकमा समायोजन निलंबन लेखे	18.30	0.49	17.16	0.49	17.16	0.50
निव्वळ	खर्ची. 17.81		खर्ची. 16.67		खर्ची 16.66	
109 - रिझर्व्ह बँक निलंबन (मुख्यालय)	5.86	14.48	0.61	18.75	(-)3.56	20.84
निव्वळ	जमा (-) 8.62		जमा 18.14		जमा 24.40	
110 - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया निलंबन- मुख्यलेखाधिकारी	43.71	3.03	381.95	376.14	404.48	365.46
निव्वळ	खर्ची 40.68		खर्ची. 5.81		खर्ची 39.02	
112 - स्रोतारंभी कर कपात निलंबन	0	180.41	653.76	827.88	(-)33.62	194.21
निव्वळ	जमा (-) 180.41		जमा.174.12		जमा 227.83	
मुख्य शीर्ष 8782-रोख रक्कम वित्तप्रेषण						
102 - सार्वजनिक बांधकाम वित्तप्रेषणे	226577.76	227677.03	234775.23	236342.95	200239.26	287820.79
निव्वळ	जमा 1099.27		जमा 1567.72		जमा 87581.53	
103 - वने वित्तप्रेषणे	1935760.02	1940625.01	16394.16	16498.86	20252.59	20171.88
निव्वळ	जमा 48.65		जमा 104.70		जमा 80.71	
स्त्रोत : संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे						

वित्तीय लेखे या शीर्षांतर्गत निव्वळ शिल्लक प्रतिबिंबित करतात. थकित खर्च आणि जमा स्वतंत्रपणे एकत्रित करून थकित शिल्लक काढली जाते.

4.7.1 कर्ज, ठेवी आणि वित्तप्रेषण शीर्षाअंतर्गत ऋण (ॲडव्हर्स) शिल्लक

ऋण शिल्लक म्हणजे जिथे उणे (निगेटिव) शिल्लक असू नये त्या लेख्यांच्या शीर्षाखाली दिसणारी उणे शिल्लक. उदाहरणार्थ, कोणत्याही कर्जाच्या किंवा अग्रिमांच्या लेख्यांच्या शीर्षासमोरील उणे शिल्लक ही मूळ अग्रिम रकमेपेक्षा जास्त परतफेड केल्याचे दर्शवते. 31 मार्च 2024 पर्यंत ऋण शिल्लक रकमेची नऊ प्रकरणे होती. यामध्ये एलआयसी ऑफ इंडिया कडून कर्जे (मुख्य शीर्ष 6003-103) - ₹ 1.06 कोटी, औद्योगिक प्रशिक्षणाकडून इतर कर्जे (मुख्य शीर्ष 6202-800) - ₹ 3.69 कोटी, सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमे यांना कर्जे (मुख्य शीर्ष 6401-190) - ₹ 0.77 कोटी, कुक्कुटपालन विकास कर्जे (मुख्य शीर्ष 6403-103) - ₹ 1.01 कोटी, मेंढी आणि लोकर विकास कर्जे (मुख्य शीर्ष 6403-104) - ₹ 8.64 कोटी, इतर कृषी कार्यक्रमासाठी कर्जे - इतर कर्जे (मुख्य शीर्ष 6435- 800) - ₹ 0.02 कोटी, इतर वाहने खरेदीसाठी अग्रिम (मुख्य शीर्ष 7610-203) - ₹ 1.50 कोटी, संगणक खरेदीसाठी अग्रिम (मुख्य शीर्ष 7610-204) - ₹ 1.48 कोटी इत्यादींचा समावेश होतो.

चुकीचे वर्गीकरण, निधीच्या उपलब्धतेपेक्षा अधिक संवितरण, मिळालेल्या योगदानापेक्षा अधिक संवितरण, एका लेखा घटकांकडून दुसऱ्या लेखा घटकांकडे शिल्लक ओढून न नेणे, प्रशासकीय पुनर्रचनेमुळे राज्ये /अधिक लेखा घटक तयार होणे यामुळे ऋण शिल्लक होते.

मुख्य शीर्ष 8670-धनादेश व देयके, 103 - विभागांतर्गत धनादेश या शीर्षांतर्गत लोक लेख्यांमध्ये ₹ 10,078.39 कोटी ऋण शिल्लक होती. लोक लेखे, लोक ऋण आणि कर्जे व अग्रिमे यांच्याशी संबंधित ऋण शिल्लक रक्कम भरून काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे.

4.8 विभागीय आकडेवारीचा ताळमेळ न घालणे

महसूल/खर्चावर प्रभावी अर्थसंकल्पीय नियंत्रण ठेवण्यासाठी आणि लेख्यांमध्ये अचूकता सुनिश्चित करण्यासाठी, सर्व नियंत्रण अधिकाऱ्यांनी, यथास्थिती, प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई किंवा महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-II, महाराष्ट्र, नागपूर किंवा अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई यांच्या कार्यालयांनी नोंदवलेल्या आकडेवारीशी शासनाच्या जमा आणि खर्चाचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

वर्ष 2023-24 मध्ये राज्य शासनाने महसुली जमा ₹ 2,63,912.57 कोटी (एकूण महसुली जमेच्या 98 *टक्के*) व महसुली खर्च ₹ 3,64,728.27 कोटी (एकूण महसुली खर्चाच्या 89 *टक्के*) आणि भांडवली खर्च ₹ 56,891.88 कोटी (एकूण भांडवली खर्चाच्या 82.61 *टक्के*) या सर्व रकमांचे समायोजन, जमा व खर्च वगळून अंतरण प्रविष्टी आणि नियतकालिक समायोजन यांच्याद्वारा समायोजन केलेल्या जमा आणि खर्च वगळता केले होते. राज्य शासनाकडून देण्यात आलेली ₹ 4,635.18 कोटी रकमेची कर्जे व अग्रिमे (राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या एकूण कर्जे व अग्रिमांच्या 94.51 *टक्के*) यांचे समायोजन केले. नियंत्रण अधिकाऱ्यांची संख्या आणि गेल्या तीन वर्षांतील खर्चाच्या ताळमेळाचे प्रमाण यासंबंधीचा तपशील **तक्ता 4.10** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

तक्ता 4.10: खर्चाच्या आकडेवारीच्या ताळमेळाची स्थिती

वर्ष	नियंत्रण अधिकारी/आहरण व संवितरण अधिकारी			
	एकूण संख्या	संपूर्णतः ताळमेळ	अंशतः ताळमेळ	ताळमेळ मुळीच घेतला नाही
2020-21	7075	6393	281	401
2021-22	7040	6572	233	235
2022-23	7065	6642	273	150
2023-24	6742	5780	801	161

स्त्रोत : प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय यांनी संकलित केलेली माहिती

2021-22 ते 2023-24 या कालावधीतील ताळमेळाची स्थिती **आलेख 4.5** मध्ये दर्शविली आहे.

आलेख 4.5: 2021-22 ते 2023-24 दरम्यान ताळमेळाची स्थिती



(स्त्रोत: संबंधित वर्षाचे वित्तीय लेखे)

4.9 रोख शिल्लक रकमेचा ताळमेळ

प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांच्या लेखापुस्तकांनुसार राज्याची रोख शिल्लक आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रतिवेदित केलेली रोख शिल्लक यात कोणतीही तफावत नसावी. 2023-24 या वर्षाच्या लेख्यानुसार व भारतीय रिझर्व्ह बँकेनुसार या वर्षात 31 मार्च 2024 रोजी ताळमेळ न घेतलेला फरक दर्शविणारी रोख शिल्लक **तक्ता 4.11** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 4.11: रोख शिल्लक रकमेचा ताळमेळ न घेतलेला फरक

(₹ कोटीत)

महालेखाकारांच्या लेखापुस्तकानुसार	भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रतिवेदित केल्यानुसार	फरक (31.03.2024 रोजी)
3,154.46 (जमा)	3,384.93 (खर्ची)	230.47 (जमा)
स्त्रोत: वित्तीय लेखे 2023-24		

₹ 230.47 कोटींची (जमा) तफावत ही प्रामुख्याने कोषागार/भारतीय रिझर्व्ह बँक/अभिकरण बँक आणि प्रधान महालेखाकार कार्यालय यांच्यामधील प्रलंबित ताळमेळ यामुळे आहे. या तफावतींचा ताळमेळ घेणे चालू आहे आणि 30 जून 2024 पर्यंत ही तफावत ₹ 143.01 कोटी जमा (निव्वळ) पर्यंत कमी करण्यात आला होता.

प्रकटनाशी संबंधित मुद्दे.

4.10 लेखांकन मानकांचे अनुपालन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 150 नुसार भारताचे राष्ट्रपती भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार केंद्र आणि राज्यांच्या लेख्यांचे नमुने (फॉर्म) विहित करू शकतात. याशिवाय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी 2002 मध्ये उत्तरदायित्व कार्यतंत्र वाढविण्यासाठी शासकीय लेखांकन आणि वित्तीय प्रतिवेदन मानके तयार करण्याकरिता शासकीय लेखांकन मानके सल्लागार मंडळ स्थापन केले. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सल्ल्यानुसार भारताच्या राष्ट्रपतींनी आतापर्यंत चार भारतीय शासकीय लेखांकन मानके अधिसूचित केली आहेत

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या त्यांच्या अधिसूचनेनंतर प्रभावी तारखेपासून खालील चार भारतीय शासकीय लेखांकन मानके अनिवार्य झाली.

1. शासनाने दिलेल्या हमी - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 1**
2. सहाय्यक अनुदानाचे लेखांकन व वर्गीकरण - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 2**
3. शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 3**

4 पूर्व कालावधी समायोजन - **भारतीय शासकीय लेखांकन मानक 4**

राज्य शासनाकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे भारतीय शासकीय लेखांकन मानकांच्या प्रकटन आवश्यकतांचे कोणत्या मर्यादेपर्यंत पालन केले गेले नाही ते **तक्ता 4.12** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 4.12: लेखांकन मानकांचे अनुपालन

अ.क्र.	लेखांकन मानके	भारतीय शासकीय लेखांकन मानकांचे सार	राज्य शासनाकडून अनुपालन	कमतरतेचा परिणाम
1.	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 1:** शासनाने दिलेल्या हमी - प्रकटन आवश्यकता	या मानकानुसार शासनाने वर्षभरात दिलेल्या हमीची जास्तीत जास्त रक्कम आपल्या वित्तीय विवरणपत्रात जाहीर करणे आवश्यक आहे, ज्यात दिलेल्या हमी, वगळलेल्या हमी, लागू केलेल्या हमी, मुक्त केलेल्या हमी आणि वर्षअखेरीस थकीत हमी यांचा तपशील असणे आवश्यक आहे.	अंशत: पालन केले राज्य विधिमंडळाने ज्या मर्यादेत शासन हमी देऊ शकते ती मर्यादा निश्चित केली नाही.	कर्जदार गटाकडून थकबाकीची परतफेड, कायमस्वरुपी कर्जे, थकबाकीतील व्याज देयके असल्यास शासनाने सादर केली नाहीत. व्याज/मुद्दल न भरल्यास महसुली व राजकोषीय तुटीवर परिणाम होऊ शकतो.
2.	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 2:** *सहाय्यक अनुदानाचे लेखांकन आणि वर्गीकरण*	सहाय्यक अनुदानाचा अंतिम वापर काहीही असो, अनुदानकर्त्यांच्या लेख्यात महसुली खर्च म्हणून आणि अनुदानग्राहीच्या लेख्यात महसुली जमा म्हणून वर्गीकरण केले जाईल.	अंशतः पालन केले	संस्थांना देण्यात आलेल्या ₹ 3,544.73 कोटी सहाय्यक अनुदानाचे वर्गीकरण महसुली शीर्षाऐवजी भांडवली शीर्षाखाली करण्यात आले. अनुपालन न केल्याने महसुली तुटीमधे त्या प्रमाणात ऊनोक्ती झाली.
3.	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 3:** *शासनाने दिलेली कर्जे आणि अग्रिमे*	हे मानक संपूर्ण, अचूक आणि एकसमान लेखांकन पद्धती सुनिश्चित करण्यासाठी शासनाने दिलेल्या कर्जे आणि अग्रिमांच्या संदर्भात शासनाच्या वित्तीय विवरणपत्रांत मान्यता, मोजमाप, मूल्यांकन आणि अहवाल देण्याशी संबंधित आहे.	अंशत: पालन केले (वित्तीय लेखे विवरणपत्र 7 आणि 18)	कर्जदार गटाकडून थकबाकीची परतफेड, कायमस्वरुपी कर्जे, थकबाकीतील व्याज प्रदाने जर काही असेल याची माहिती शासनाने सादर केली नाही. व्याज/मुद्दल न भरल्यास महसुली व राजकोषीय तुटीवर परिणाम होऊ शकतो.
4	**भारतीय शासकीय लेखांकन मानक - 4::** *पूर्व कालावधी समायोजन* .	मानकांचे उद्दीष्ट केवळ आधीच्या कालावधीतील त्रुटींशी संबंधित अशी माहिती उघड करणे नाही तर शासकीय निर्णयांमधील बदलांमुळे उद्भवलेल्या पूर्व कालावधी समायोजनाची आवश्यकता असलेल्या नोंदींचा देखील समावेश करणे आहे ज्यामुळे मागील वर्षांमधील चालू शिल्लक आणि पुरोगामी रकमेवर परिणाम होऊ शकतो ज्यासाठी लेखे बंद केले गेले आहेत.	पालन केले	2023-24 मध्ये लेख्यांमध्ये कोणत्याही मुदतीचे पूर्व कालावधी समायोजन करण्यात आले नाही.

4.11 स्वायत्त संस्थांचे लेखे/पृथक लेखापरीक्षा अहवाल सादर करणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 19 (3) नुसार, राज्यपाल/प्रशासक हे सार्वजनिक हितासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करू शकतात की, यथास्थिती, राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या विधिमंडळाने

कायद्याने स्थापन केलेल्या महामंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करावे आणि जर अशी विनंती प्राप्त झाली तर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक अशा महामंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करतील आणि अशा लेखापरीक्षणाच्या हेतूसाठी, त्यांना अशा महामंडळांची पुस्तके आणि लेखे पडताळण्याचा अधिकार असेल.

कलम 19 व्यतिरिक्त, जेथे कोणत्याही कायद्याने किंवा त्याअंतर्गत एखाद्या संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपवले गेले नाही, तर यथास्थिती, राष्ट्रपती, किंवा एखाद्या राज्याचे राज्यपाल किंवा विधीमंडळ असलेल्या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक यांनी तशी विनंती केल्यास, अशा संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण त्याच्या आणि संबंधित शासन यांच्यामध्ये मान्य होईल अशा अटी व शर्तींवर करतील आणि अशा लेखापरीक्षणाच्या हेतूने, त्या संस्थेची किंवा प्राधिकरणाची पुस्तके आणि लेखे बघण्याचा त्यांना अधिकार असेल (कलम 20).

वरील स्वायत्त संस्था आणि प्राधिकरणांच्या बाबतीत जर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक हे एकमेव लेखापरीक्षक असतील तर लेखापरीक्षण प्रमाणपत्र जारी केले जाते. म्हणून , या संस्था आणि प्राधिकरण यांनी त्यांचे वार्षिक लेखे तयार करणे आणि लेखापरीक्षणासाठी महालेखाकार (लेखापरीक्षा) यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण प्रमाणपत्राव्यतिरिक्त, आर्थिक लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर, लेखापरीक्षा कार्यालय पृथक लेखापरीक्षण अहवाल जारी करते जो लेख्यांवरील लेखापरीक्षण प्रमाणपत्राचा भाग आहे. हे पृथक लेखापरीक्षण अहवाल राज्य विधिमंडळासमोर सादर केले जातात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण, गृहनिर्माण, उद्योग, पाटबंधारे, नगरविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता या क्षेत्रात स्वायत्त संस्था स्थापन केल्या आहेत. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 19 आणि 20 अन्वये राज्यातील 28 स्वायत्त संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. लेखापरीक्षण सोपविणे, लेखापरीक्षणासाठी लेखे सादर करणे, पृथक लेखापरीक्षा अहवाल जारी करणे आणि स्वायत्त संस्थांद्वारे विधिमंडळात तो सादर करणे यांची स्थिती **परिशिष्ट 4.4** मध्ये दर्शविली आहे.

नोव्हेंबर 2024 मध्ये नियत असलेले 2023-24 या वर्षाचे लेखे एकाही स्वायत्त संस्थेकडून प्राप्त झाले नाही. स्वायत्त संस्थांच्या लेख्यांची प्रलंबितता **तक्ता 4.13** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 4.13: संस्था किंवा प्राधिकरणांच्या लेख्यांची प्रलंबितता

अ.क्र.	संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे नाव	लेखे केव्हापासून प्रलंबित	2023-24 पर्यंत प्रलंबित असलेल्या लेख्यांची संख्या
1	महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग	2018-19	6
2	महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग	2016-17	8
3	महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ	2021-22	3
4	महाराष्ट्र जलसंपदा नियामक प्राधिकरण	2023-24	1
5	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे	2023-24	1
6	महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण	2023-24	1

अ.क्र.	संस्थेचे किंवा प्राधिकरणाचे नाव	लेखे केव्हापासून प्रलंबित	2023-24 पर्यंत प्रलंबित असलेल्या लेख्यांची संख्या
7	महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई	2023-24	1
8	महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरण	2023-24	1
9	मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई	2023-24	1
10	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई	2023-24	1
11	झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे	2023-24	1
12	गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर	2021-22	3
13	तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव	2022-23	2
14	विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर	2023-24	1
15	महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर	2022-23	2
16	प्रवेश नियमन प्राधिकरण	2015-16[4]	9
17	कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे	2023-24	1
18	महाराष्ट्र वीज नियामक आयोग	2023-24	1
19	महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई	2023-24	1
20	महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई	2019-20	5
21	प्रतिपूरक वनीकरण निधी व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण	2022-23	2
22	महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई	2023-24	1
23	महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई	2023-24	1
24	महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई	2023-24	1
25	महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोग	2023-24	1

स्त्रोत : प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई व महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती

हिशेब सादर करण्यास आणि ते विधिमंडळात सादर करण्यास झालेल्या प्रचंड विलंबाच्या परिणामी ज्या संस्थांमध्ये शासकीय गुंतवणूक केली गेली त्या संस्थांच्या कामकाजाची विधिमंडळाने छाननी करण्यास विलंब झाला.

4.12 विभागीय वाणिज्यिक उपक्रम/महामंडळे/कंपन्या

वाण्यिजिक आणि अर्ध-वाणिज्यिक स्वरूपाचे उपक्रम राबविणाऱ्या शासकीय विभागांच्या विभागीय उपक्रमांनी प्रतिवर्षी विहित नमुन्यात आर्थिक कामकाजाचे परिणाम दर्शविणारे प्रपत्र (प्रोफॉर्मा) लेखे तयार करणे आवश्यक आहे, जेणेकरून शासन त्यांच्या कामाचे मूल्यमापन करू शकेल. विभागीय व्यवस्थापित वाण्यिजिक आणि अर्ध-वाण्यिजिक उपक्रमांचे अंतिम झालेले लेखे त्यांचे एकूण आर्थिक स्थिति आणि कार्यक्षमता दर्शवितात. लेखे वेळेत अंतिम न झाल्यास शासनाची गुंतवणूक लेखापरीक्षण/राज्य विधिमंडळाच्या तपासणीच्या बाहेर राहते. परिणामी, उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारात्मक उपाययोजना वेळीच केल्या जाऊ शकत नाहीत. शिवाय या दिरंगाईमुळे यंत्रणेत फसवणूक आणि जनतेच्या पैशांचा अपव्यय होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो

[4] प्रवेश नियामक प्राधिकरणाने लेखापरीक्षणाला अभिलेख सादर न केल्यामुळे, 2015-16 ते 2019-20 या वर्षांसाठी प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे परत करण्यात आले

शासकीय विभागप्रमुखांनी हे सुनिश्चित करावे की उपक्रमांनी असे लेखे तयार करून ते ठराविक मुदतीत लेखापरीक्षणासाठी यथास्थिती महाराष्ट्राच्या प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II यांच्याकडे सादर केले आहेत.

मार्च 2024 अखेरीस 49 विभागीय वाणिज्यिक उपक्रम होते. ज्या वर्षासाठी प्रपत्र लेखे अंतिम करण्यात आले आहेत, त्या वर्षापर्यंत शासनाने केलेल्या विभाग-निहाय गुंतवणुकीची स्थिती, निव्वळ नफा/तोटा तसेच या उपक्रमांमध्ये गुंतवलेल्या भांडवलावरील परतावा **परिशिष्ट 4.5** मध्ये देण्यात आला आहे.

असे निदर्शनास आले की

- राज्य शासनाने या 49 विभागीय वाणिज्यिक उपक्रमांत त्यांचे लेखे अंतिम झाले होते त्या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत ₹ 5,016.05 कोटीची गुंतवणूक केली होती. (**परिशिष्ट 4.6**).
- 49 घटक असलेल्या चार उपक्रमांपैकी केवळ चार[5] घटकांना ₹ 48.72 कोटी भांडवली गुंतवणुकीच्या तुलनेत ₹ 8.59 कोटीचा निव्वळ नफा मिळू शकला.

काही उपक्रमांचे मोठे नुकसान लक्षात घेता त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासनाने त्यांच्या कामाचा आढावा घ्यावा किंवा शक्य नसेल तेथे ते बंद करावेत.

4.13 संस्था व प्राधिकरणे यांना दिलेल्या अनुदानाचा/कर्जाचा तपशील सादर न करणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 14 अन्वये जेव्हा कोणत्याही संस्थेला किंवा प्राधिकरणाला राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदान किंवा कर्जाद्वारे मोठ्या प्रमाणात वित्तपुरवठा केला जातो तेव्हा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक, यथास्थिती, संस्थेला किंवा प्राधिकरणाला लागू असलेल्या कोणत्याही कायद्यातील तरतुदींच्या अधीन राहून, त्या संस्थेच्या किंवा प्राधिकरणाच्या अशा सर्व जमा आणि खर्चाचे लेखापरीक्षण करतील आणि त्यांनी लेखापरीक्षण केलेल्या जमा आणि खर्चाचा अहवाल देतील. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्य, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, 1971 च्या कलम 15 अन्वये, जेथे कोणत्याही विशिष्ट हेतूसाठी कोणतेही अनुदान किंवा कर्ज दिले जाते, तेव्हा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक त्या प्रक्रियेची छाननी करतील ज्याद्वारे मंजुरी देणारे प्राधिकरण ठराविक अटींची पूर्तता केल्याची खात्री करतील.

वरील कलमांतर्गत लेखापरीक्षण करावयाच्या संस्था / निगम / प्राधिकरणे शोधून काढणे आवश्यक आहे आणि ज्या संस्थांना ₹ 25 लाख किंवा त्यापेक्षा अधिक अर्थसहाय्य देण्यात आले त्यांना कोणत्या हेतूने मदत देण्यात आली व त्या संस्थांचा एकूण खर्च याची माहिती शासकीय विभागप्रमुखांनी दरवर्षी लेखापरीक्षणास सादर करणे आवश्यक आहे. वर्षभरात संस्थांना देण्यात आलेल्या अशा मदतीचा तपशील शासकीय विभागांकडून प्रतीक्षेत होता (ऑगस्ट 2024).

[5] घटक योजना, मुंबई (2014-15) नफा ₹ 0.61 कोटी : पशुखाद्य योजना (2014-15) नफा ₹ 4.14 कोटी : वन विभागाची अल्लापल्ली व पेंडीगुंडम वनपरिक्षेत्रे (1985-86) ₹ 3.83 कोटीचा नफा : बुलडोझर योजनेतून भू-विकास योजना, नागपूर (1996-97) नफा ₹ 0.01 कोटी

ऑगस्ट 2024 अखेरीस 5,792 वार्षिक लेख्यासंदर्भात 2023-24 पर्यंत नियत असलेल्या वार्षिक लेख्यांची वर्ष-निहाय प्रलंबितता **तक्ता 4.14** मध्ये दर्शविली आहे.

तक्ता 4.14: संस्थांकडून नियत वार्षिक लेख्यांची वर्ष-निहाय प्रलंबितता

विलंबितता वर्षांच्या संख्येत	लेख्यांची संख्या
0-1	601
1-3	1008
3-5	1079
5-7	920
7-9	532
9 आणि त्यापेक्षा जास्त	1652
एकूण	**5792**
स्त्रोत : प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती	

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडून अर्थसहाय्य घेणाऱ्या संस्थांची संबंधित लेखे सादर करण्यातील प्रलंबितता मोठ्या प्रमाणात आहे.

विविध संस्थांना देण्यात येणारे अनुदान व कर्जांबाबत माहिती सादर न करणे व त्यांनी लेखे सादर न केल्याने निधीचा गैरवापर होण्याचा धोका वाढतो व त्यावर उपाययोजना करण्यासाठी हे शासनाच्या निदर्शनास आणून दिले जात आहे.

4.14 कालबद्धता आणि लेख्यांची गुणवत्ता

34 कोषागार व एक आभासी कोषागार (ई-पावती लेखांकीत करणारे), 173 वन विभाग, 182 जल संपदा विभाग, 163 सार्वजनिक बांधकाम विभाग, एक अधिदान व लेखा कार्यालय यांनी पाठविलेले प्राथमिक लेखे व भारतीय रिझर्व बँकेची संप्रेषणे यांवरून राज्य शासनाचे लेखे प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) संकलित करतात. 2023-24 दरम्यान मासिक नागरी लेख्यांमध्ये कोणतेही लेखे वगळण्यात आलेले नाही.

4.15 गैरव्यवहार, तोटा, चोऱ्या इ.

मुंबई वित्तीय नियम, 1959 मध्ये अशी तरतूद आहे की, कोषागार किंवा इतर कोणत्याही कार्यालय/विभागात अफरातफर, फसवणुकीने रक्कम काढणे/प्रदान करणे किंवा अन्यथा आढळल्यास त्याची माहिती संबंधित कार्यालयाने तात्काळ पुढील वरिष्ठ प्राधिकाऱ्यास तसेच प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांना द्यावी.

राज्य शासनाने 31 मार्च 2024 पर्यंत ₹ 5,276.14 लाखांचा दुर्विनियोग, गैरव्यवहार आदींच्या 239 प्रकरणांचा अहवाल दिला असून त्यावर अंतिम कार्यवाही प्रलंबित आहे. सर्व 239 प्रकरणांमध्ये प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करण्यात आला. प्रलंबित प्रकरणांची कालमर्यादा आणि या घटनांमधून समोर आलेल्या प्रत्येक प्रवर्गातील प्रलंबित प्रकरणांची संख्या **परिशिष्ट 4.7** आणि **परिशिष्ट 4.8** मध्ये सारांशित केली आहे.

पुढील विश्लेषणात कोणत्या कारणामुळे प्रकरणे प्रलंबित असून सूचीबद्ध केलेल्या विविध श्रेणींमध्ये वर्गीकृत केली जाऊ शकली हे **तक्ता 4.15** मध्ये दर्शविले आहे.

तक्ता 4.15: दुर्विनियोग, तोटा, चोरी इ. प्रलंबित प्रकरणांची कारणे

(₹ लाखात)

अ.क्र.	विलंब/प्रलंबित प्रकरणांची कारणे	प्रकरणांची संख्या	रक्कम
1	विभागीय कार्यवाहीच्या प्रतीक्षेत	26	101.86
2	विभागीय कार्यवाही प्रगती पथावर	55	762.61
3	निर्लेखित करण्यासाठीच्या आदेशाच्या प्रतीक्षेत	38	52.11
4	न्यायालयीन कार्यवाहीमुळे प्रलंबित	99	953.37
5	इतर कारणांमुळे प्रलंबित	21	3406.19
	एकूण	**239**	**5276.14**

स्त्रोत : प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, मुंबई, महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, नागपूर व अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती

4.16 अखर्चित रक्कम आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये पडून राहणे

राज्यघटनेच्या कलम 204(3) नुसार कलम 204, 205 किंवा 206 मधील तरतुदींनुसार कायद्याने केलेल्या विनियोगाशिवाय राज्याच्या एकत्रित निधीतून कोणताही पैसा काढता येणार नाही. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र कोषागार नियमावलीच्या नियम 282 (1) अन्वये प्रत्यक्षात झालेल्या सर्व खर्चाचे एकाच वेळी प्रदान करणे व आहरण करणे आवश्यक असून कोणत्याही परिस्थितीत ते दुसऱ्या वर्षाच्या अनुदानातून भरण्यास परवानगी देता येणार नाही. नियम 282(2) नुसार तात्काळ वाटपाची गरज असल्याशिवाय कोषागारातून पैसे काढले जाणार नाहीत. मागणीच्या अपेक्षेने किंवा अर्थसंकल्पीय अनुदान व्यपगत होणे रोखण्याच्या दृष्टीने रक्कम आहरित करणे अनुज्ञेय नाही. अशा प्रकारे एखाद्या विशिष्ट आर्थिक वर्षाशी संबंधित खर्च त्याच आर्थिक वर्षात लेखांकित करावा लागतो आणि तो संबंधित आर्थिक वर्षाच्या त्याच अनुदान आणि विनियोगांतर्गत खर्च केला जातो.

राज्य शासनाने उपलब्ध करून दिलेल्या तपशीलानुसार, महाराष्ट्र शासनाच्या कोषागारांनी 2023-24 मध्ये विविध आहरण आणि संवितरण अधिकारांच्या बँक खात्यांमध्ये ₹ 91,086.80 कोटीचा निधी हस्तांतरित केला, ज्याकरिता पावत्यांचे तपशील प्रधान महालेखाकार कार्यालयाला (लेखा व अनुज्ञेयता) उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. त्याच आर्थिक वर्षात 35 विभागांच्या आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांनी ₹ 8,367.58 कोटीचा निधी खर्च म्हणून लेखांकित करूनही त्यांना त्याच आर्थिक वर्षात तो पूर्णपणे खर्च करता आला नाही आणि 31 मार्च 2024 रोजी त्यांच्या बँक खात्यात अखर्चित राहिला. त्यामुळे त्या प्रमाणात खात्यांमध्ये प्रतिबिंबित होणारा शासकीय खर्च अंतिम नसून अखर्चित रकमेच्या मर्यादेपेक्षा कमी आहे. आहरण आणि संवितरण अधिकाऱ्यांकडे अखर्चित पडून असलेल्या रकमेचा विभागनिहाय तपशील **परिशिष्ट 4.9** मध्ये दाखविला आहे. 31 मार्च 2021 रोजी संपलेल्या वर्षाच्या राज्य वित्त लेखापरीक्षण अहवालातही असाच मुद्दा अधोरेखित करण्यात आला होता.

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांद्वारे मागील आर्थिक वर्षांशी संबंधित असलेल्या शिलकीसह होणारे व्यवहार त्यांना सामान्य अर्थसंकल्पीय प्रक्रियेपासून दूर ठेवतात आणि ज्या वर्षात ते ठेवले जातात त्या वर्षाच्या वित्त आणि विनियोग खात्यात त्यांची नोंद नसल्यामुळे त्यांना कायदेशीर देखरेखीबाहेर नेले जाते, ज्यामुळे फसवणूक / गैरव्यवहाराचा धोका वाढतो.

4.17 राज्य वित्तीय लेखापरीक्षण अहवालाचा पाठपुरावा

वर्ष 2008-09 पासून राज्य वित्तीय लेखापरीक्षण अहवाल विधिमंडळात सादर केला जात आहे. राज्य लोकलेखा समितीने राज्य वित्त लेखा परीक्षा अहवाल 2016-17 च्या प्रकरण I वर चर्चा करून (मे 2019) 37 शिफारशी केल्या (लोकलेखा समिती अहवाल क्रमांक 68). 19 शिफारशींवरील कार्यवाही अहवाल प्राप्त झाले आहेत. 2023-24 मध्ये लोकलेखा समितीची बैठक आयोजित करण्यात आली नाही. या शिफारशींच्या अंमलबजावणीद्वारे दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेल्या त्रुटी वर्षानुवर्षे कायम आहेत आणि आमच्या अहवालात नोंदविल्या जात असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे.

4.18 निष्कर्ष

- राज्य शासनाच्या 32 विभागांना देण्यात आलेल्या एकूण ₹ 36,756.09 कोटी (10,793 उपयोगिता प्रमाणपत्रे) अनुदानासंदर्भातील उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्रे नसल्यामुळे प्राप्तकर्त्यांनी अनुदान ज्या उद्देशासाठी दिले होते त्यासाठी वापरले आहे याची खातरजमा होऊ शकली नाही.
- 31 मार्च 2024 अखेरीस राज्य शासनाच्या 31 विभागांनी 1,438 संक्षिप्त आकस्मिक देयकांच्या बद्दल ₹ 3,674.60 कोटीची तपशीलवार आकस्मिक देयके सादर केली नव्हती. दीर्घ कालावधीसाठी अग्रिमांचे समायोजन न केल्याने गैरव्यवहार होण्याचा धोका असतो आणि म्हणूनच तपशीलवार आकस्मिक देयके सादर करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे.
- 2023-24 मध्ये राज्य शासनाने 53 मुख्य शीर्षांशी संबंधित ₹ 5,307.62 कोटी जमांचे (₹ 5,57,326.18 कोटीच्या एकूण एकत्रित महसुली जमांच्या 0.95 *टक्के*) गौण शीर्षकाखाली '800- इतर जमा' अंतर्गत वर्गीकरण केले, तर 50 महसुली आणि भांडवली या मुख्य लेखा शीर्षकांतर्गत ₹ 16,730.54 कोटींचा खर्च गौण शीर्ष 800 अंतर्गत वर्गीकृत केला जो एकूण ₹ 5,62,714.85 कोटींच्या एकूण एकत्रित खर्चाच्या 2.97 *टक्के* होता.
- वर्ष 2023-24 मध्ये ₹ 2,63,912.57 कोटी (एकूण महसुली जमांच्या 98 *टक्के*) महसुली जमा आणि ₹ 3,64,728.27 कोटी (एकूण महसुली खर्चाच्या 89 *टक्के*) महसुली खर्च आणि ₹ 56,891.88 कोटी (एकूण भांडवली खर्चाच्या 82.61 *टक्के*) भांडवली खर्च या सर्व रकमांचे समायोजन, अंतरण प्रविष्टी(ट्रान्सफर एंट्रीज) आणि नियतकालिक समायोजन द्वारा समायोजन केलेल्या जमा आणि खर्च वगळता केले होते. राज्य शासनाने दिलेली ₹ 4,635.18 कोटीची (राज्य शासनाने दिलेल्या एकूण कर्जे व अग्रिम रकमेच्या 94.51 *टक्के*) कर्जे व अग्रिम रकमेचा ताळमेळ घेण्यात आला. यासंदर्भातील कायदेशीर तरतुदी आणि कार्यकारी सूचनांचे पालन न केल्यास लेख्यांत जमा आणि खर्च या दोन्हींचे चुकीचे वर्गीकरण आणि नोंदणी होण्याचा धोका असू शकतो.
- 31 मार्च 2024 पर्यंत 25 स्वायत्त संस्थांचे 56 वार्षिक लेखे लेखापरीक्षणासाठी भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रलंबित होते. लेखे सादर करण्यास आणि ते राज्य विधिमंडळात प्रस्तुत करण्यास झालेल्या प्रचंड विलंबामुळे ज्या संस्थांमध्ये शासनाने गुंतवणूक केली आहे त्या संस्थांच्या कामकाजाची विधिमंडळाने छाननी करण्यास उशीर केला.

4.19 शिफारशी

(i) उपयोगिता प्रमाणपत्रे, तपशीलवार आकस्मिक देयके आणि लेखापरीक्षणासाठी लेखे सादर करण्यासंदर्भात विभागांनी विहित नियम आणि कार्यपद्धतींचे पालन केले आहे की नाही याची खात्री करण्यासाठी राज्य शासनाने कठोर देखरेख यंत्रणा स्थापन करावी.

(ii) राज्य शासनाने सर्वसमावेशक गौण शीर्ष 800 च्या वापरास परावृत्त करावे आणि प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांच्याशी सल्लामसलत करून लेख्यांत व्यवहारांचे योग्य वर्गीकरण करण्यासाठी योग्य लेखा शीर्षांची निवड करण्यासाठी एक विशिष्ट कालमर्यादा ठरवावी.

(iii) अंतर्गत नियंत्रण यंत्रणा बळकट करणे आवश्यक आहे आणि शासकीय व्यवहारांच्या हिशेबात पारदर्शकता आणि अचूकता आणण्यासाठी नियंत्रण अधिकाऱ्यांनी त्यांच्या जमा आणि खर्चाच्या आकडेवारीची प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) यांच्याकडील आकडेवारीशी विहित कालांतराने ताळमेळ घेतल्याची सुनिश्चिती शासनाने करणे आवश्यक आहे.

(सी. एम. साने)
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I
महाराष्ट्र, मुंबई

मुंबई
दिनांक: 09 मे 2025

प्रतिस्वाक्षरित

(के. संजय मूर्ति)
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

नवी दिल्ली
दिनांक: 13 मे 2025